| | |
|---|---|
| <u>फिर्यादी तर्फे साक्षीदार क्र. १</u> | <u>**सं.फौ.ख.क्र.१०/२०२३**</u> |
| | **प्रमोद विरूध्द अशफाक** |
| **मी शपथपूर्वक खरे सांगतो की** | **निशाणी – १२ पुढे चालू** |

**पुढील सरतपास फिर्यादी तर्फे वकील श्री. टेकाम यांच्यातर्फे**

४७. मला आता निशाणी २७/१ कडील नोटीस दाखविली, सदरची नोटीस मी वकीलांमार्फत आरोपीला पाठविली होती, त्यावर माझी व माझ्या वकीलांची सही आहे, त्यातील मजकूर बरोबर आहे, त्यास <u>**निशाणी ३६**</u> देण्यात येते.

४८. मला आता निशाणी २७/२ व २७/३ कडील नोटीस पाठविण्यासाठी पोस्टात पैसे भरल्याच्या पावत्या व २७/४ व २७/५ कडील नोटीसपोच झाल्याच्या पोस्टाच्या पावत्या दाखविण्यात आल्या. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यांना <u>**अनू.क्र. निशाणी ३७ ते ४०**</u> देण्यात येते.

४९. मला आता निशाणी २७/६ कडील मी पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीची प्रत दाखविण्यात आली. त्यावर संबंधीत पोलिसांनी अर्ज मिळाल्याबाबत सही व शिक्का केला आहे, त्यातील मजकूर बरोबर आहे, त्यावर माझी सही आहे. त्यास <u>**निशाणी ४१**</u> देण्यात येते.

५०. मला आता निशाणी १६/१ कडील माझे मालू फायनान्स कंपनी यांच्याकडील खातेउता–याची नक्कल दाखविण्यात आली. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर मालू फायनान्सच्या संबंधीत कर्मचा–याची सही आहे. सदरच्या दस्तास बँकर्स बुक्स एविडन्स ॲक्ट कलम ४ प्रमाणे दाखला जोडला नसल्याने त्यास निशाणी देता येणार नाही, सबब त्यास <u>**आर्टिकल–अ**</u> देण्यात येते.

**सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. अक्षय तालेकर यांच्या तोंडी विनंतीवरून पुढील तारखेपर्यंत तहकूब**

**फेरतपासणी नाही.**

वा.दा.ब.अ.क.के.
समक्ष

MOHAN RAMCHANDRA KAMAT
Digitally signed by MOHAN RAMCHANDRA KAMAT
Date: 2026.02.02 16:27:26 +0530

कामठी
दिनांक ३१/०१/२०२६

(मोहन रा. कामत)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्या.क्र. १, कामठी